नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १३४ Issue - 134 | वार - शुक्रवार दि. ९ ऑक्टोबर २०२६ Blow- Friday Date 9 OCTOBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे निधन



## नाना पाटेकरांच्या निधनावर पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून भावपूर्ण श्रद्धांजली; संपूर्ण कलाविश्वावर पसरली शोककळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ आणि दिग्गज अभिनेते नाना पाटेकर यांचे गुरुवारी पहाटे निधन झाले. त्यांच्या या अकस्मात जाण्याने संपूर्ण कलाविश्वावर शोककळा पसरली आहे. मनिपाल हॉस्पिटलच्या ऑन्कोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. शेखर साळकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, नानांना राहत्या घरी हृदयविकाराचा झटका आला होता. त्यानंतर त्यांना वाचवण्यासाठी तब्बल ४५ मिनिटे सीपीआर देण्यात आला, मात्र त्यांच्या शरीरातून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. वैद्यकीय आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाली असून नियमानुसार शवविच्छेदन केले जाणार असल्याचे डॉक्टरांनी स्पष्ट केले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करत, त्यांनी कला क्षेत्रात आणि समाजात निर्माण केलेल्या अतुलनीय प्रभावाचे स्मरण केले. यशस्वी करिअर आणि निडर अभिनयाचे कौतुक करताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, नाना पाटेकर हे एक अत्यंत विलक्षण आणि असाधारण कलाकार होते. त्यांनी साकारलेल्या विविध प्रकारच्या भूमिकांनी देश-विदेशातील करोडो प्रेक्षकांची मने जिंकली. यशोभूमी येथे आयोजित 'इंडिया मोबाईल काँग्रेस'च्या १० व्या आवृत्तीदरम्यान बोलताना पंतप्रधानांनी नानांच्या आठवणींना उजाळा दिला आणि संपूर्ण जीवन चित्रपटसृष्टीला समर्पित करणाऱ्या या कलाकाराचे कौतुक केले.

नाना पाटेकर यांच्या अभिनयशैलीवर आणि दृष्टिकोनावर प्रकाश टाकताना पंतप्रधान मोदी म्हणाले, नाना पाटेकर यांनी कधीही स्वतःला एका विशिष्ट चौकटीत किंवा भूमिकेत बांधून ठेवले नाही. जसे एखादे पाखरू आकाशात मुक्तपणे उडते, तसेच नानांनी संपूर्ण चित्रपटसृष्टीत स्वतःच्या अष्टपैलू अभिनयाने मोकळा संचार केला. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सिनेमा या कलेच्या समृद्धीसाठी अर्पण केले. केवळ मनोरंजन क्षेत्रापुरते मर्यादित न राहता, त्यांनी आपल्या कामातून सामाजिक भान कसे जपले, याबद्दल बोलताना पंतप्रधान म्हणाले, नाना पाटेकर यांनी आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून समाजात पसरलेल्या अन्यायावर आणि त्रुटींवर अत्यंत आक्रमकपणे प्रहार केला. ते आपल्याच परीने एक विचारवंत आणि क्रांतीकारी कलाकार होते, ज्यांनी सामाजिक वाईट गोष्टींविरुद्ध नेहमी आवाज उठवला. त्यांचे बोलके शब्द जितके शक्तिशाली होते, तितकाच त्यांचा शांत राहण्याचा अंदाजही प्रभावी होता. राष्ट्रविरोधी विचारांविरोधात ठाम भूमिका घेण्यासाठी ते नेहमीच अग्रेसर राहिले. आपल्या भावना व्यक्त करताना पंतप्रधानांनी शेवटी सांगितले, मी अभिनेते नाना पाटेकरजी यांना मनापासून श्रद्धांजली वाहतो. या कठीण प्रसंगी मी त्यांचे कुटुंबीय, जवळचे मित्र आणि त्यांच्या देशभरातील अथांग चाहत्यांच्या दुःखात सहभागी असून माझ्या संवेदना व्यक्त करतो.

### शेवटच्या दिवसांपर्यंत अभिनयात सक्रिय

**वयाच्या ७५ व्या वर्षीही नाना पाटेकर चित्रपटांमध्ये सातत्याने कार्यरत होते. अलीकडच्या काळात त्यांनी अक्षय कुमार, अभिषेक बच्चन आणि रितेश देशमुख यांची प्रमुख भूमिका असलेल्या 'हाउसफुल ५' मध्ये काम केले होते. याशिवाय विशाल भारद्वाज यांच्या 'ओ रोमिओ' (ज्यात शाहिद कपूर आणि तृप्ती डिमरी प्रमुख भूमिकेत आहेत) या चित्रपटात त्यांनी एका कडक पोलीस अधिकाऱ्याची भूमिका साकारली होती. तसेच अनिल कपूर यांच्या 'सुभेदार' या चित्रपटातही ते एका विशेष भूमिकेत दिसले होते.**

मराठी आणि हिंदी सिनेमातील सुवर्णकाळ

नाना पाटेकर हे हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीतील सर्वात प्रतिष्ठित आणि मान सन्मान मिळालेल्या कलाकारांपैकी एक होते. १९७८ मध्ये आलेल्या 'गमन' चित्रपटातून त्यांनी आपल्या अभिनय प्रवासाची सुरुवात केली होती. त्यानंतर 'परिंदा', 'प्रहार', 'अंगार', 'क्रांतीवीर', 'तिरंगा', 'खामोशी' आणि 'अब तक छप्पन' यांसारख्या एकापेक्षा एक सुपरहिट आणि अजरामर चित्रपटांतून त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला.

# पावसाळ्यानंतर पहिल्यांदाच मुंबईसह सहा जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राज्यात यंदा अपेक्षित पाऊस पडलेला नाही. अल-निनोच्या संकटामुळे राज्यातील मान्सूनवर मोठा परिणाम पडला आहे. जुलै महिन्यात राज्यात सर्वदूर चांगला पाऊस पडला. त्यानंतर राज्यात हवा तसा पाऊस पडला नाही. यामुळे राज्यावर कोरड्या दुष्काळाचे संकट उभे राहिले आहे. राज्यातील दुष्काळाची परिस्थिती पाहता राज्य सरकारने जवळपास ८० टक्के तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर झाला आहे. राज्य सरकारकडून शेतकऱ्यांना आर्थिक मदत दिली जाणार आहे. एकीकडे राज्यातील जनता या संकटाशी सामना करत असताना आता हवामान विभागाकडून उष्णतेच्या लाटेबाबत मोठा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून नागरिकांचा काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.



हवामान विभागाकडून राज्यातील चार जिल्ह्यांना ९ ऑक्टोबरसाठी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला. हवामान विभागाकडून पालघर, ठाणे, मुंबई, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग अशा सहा जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. या काळात उष्ण आणि दमट हवामान राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तसेच सिंदुदुर्ग जिल्ह्यात दुपारनंतर किंवा संध्याकाळनंतर विजांच्या कडकडाट आणि ढगांच्या कडकडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाकडून १० ऑक्टोबरला देखील उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. हवामान विभागाकडून देण्यात आलेल्या माहितीनुसार, येत्या १० ऑक्टोबरला तीन जिल्ह्यांमध्ये उष्ण आणि दमट वातावरण राहण्याची शक्यता आहे. यामध्ये ठाणे, रागड आणि रत्नागिरी जिल्ह्यांचा समावेश आहे. विशेष म्हणजे रत्नागिरीत उष्ण आणि दमट वातावरण राहणार असून संध्याकाळी ढगांच्या गडगडाटासह हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दरम्यान, कोकण किनारपट्टीवरील जिल्हे वगळता इतर राज्यांमध्ये कोरडे वातावरण राहणार असल्याची माहिती हवामान विभागाकडून देण्यात आली आहे. असं असलं तरी तापमानात वाढ झालेली बघायला मिळू शकते. सर्व जिल्ह्यांमध्ये कडाक्याचे ऊन पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांना काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### यंदा ऑक्टोबर महिन्यात तापमान उच्चांक गाठणार?

ऑक्टोबर महिन्यात दरवर्षी तापमानात वाढ होते. पण यंदा ऑक्टोबर महिन्यात तापमानाचा उच्चांक गाठण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशावेळी नागरिकांनी भरपूर पाणी पिणं आणि स्वत:ची काळजी घेणं जास्त आवश्यक आहे. दरम्यान, हवामान विभागाकडून ८ ऑक्टोबरसाठी देखील ठाणे, मुंबई, रायगड आणि रत्नागिरी या चार जिल्ह्यांना उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला होता. या काळात नागरिकांना काळजी घेण्याचं आवाहन करण्यात आलं.

# १० हजारांपर्यंतच्या दंडालाही ब्रेक; जीएसटी कौन्सिलचा मोठा निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या भारत मंडपम येथील जीएसटी कौन्सिलच्या ५७ व्या बैठकीत व्यापारी आणि उद्योग जगतासाठी अत्यंत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. जीएसटी नियमांचे पालन सुलभ करण्यासाठी आणि कायदेशीर विवाद कमी करण्यासाठी या बैठकीत कौन्सिलने जीएसटी कायद्यांतर्गत अधिकाऱ्यांना असलेले अटक करण्याचे अधिकार पूर्णपणे रद्द केले आहेत. या निर्णयामुळे देशभरातील व्यावसायिक आणि उद्योजकांना मोठा दिलासा मिळाला आहे. जीएसटी रिफंड मंजूर करण्याची मुदत १५ दिवसांवरून थेट १० दिवसांवर आणण्यात आली आहे. त्यामुळे व्यवसायांना अडकलेला निधी तुलनेने लवकर उपलब्ध होणार आहे. विशेष म्हणजे, जीएसटी दरांच्या रचनेत सध्या कोणताही बदल करण्यात आलेला नाही. दरांशी संबंधित मुद्द्यांचा विचार आता वर्षातून एकदाच केला जाणार आहे. सरकारचा भर आता करदरांपेक्षा करव्यवस्था अधिक सुलभ, पारदर्शक आणि चेहराविरहित करण्यावर असल्याचं अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट केलं.

जीएसटी कौन्सिलने या बैठकीत व्यापाऱ्यांवरील कायदेशीर कारवाईची टांगती तलवार दूर करताना अनेक दिलासादायक निर्णय दिले आहेत:

जीएसटी कायद्यांतर्गत अधिकाऱ्यांकडे असलेले अटकेचे सर्व अधिकार मागे घेण्यात आले आहेत. जीएसटी उल्लंघनाबाबत थेट खटला भरण्याची मर्यादा १ कोटी रुपयांवरून वाढवून थेट ५ कोटी रुपये करण्यात आली आहे. गुन्ह्यांसाठी असणारी किमान शिक्षेची तरतूद हटवण्यात आली असून, आता दंड किंवा शिक्षेचे स्वरूप हे पूर्णपणे न्यायव्यवस्थेच्या अधिकारात राहील.

छोट्या व्यापाऱ्यांना दिलासा देताना कौन्सिलने सामान्य दंडाच्या रकमेमध्ये मोठी कपात केली आहे. ज्या उल्लंघनासाठी पूर्वी कोणतीही दंडाची रक्कम निश्चित नव्हती, अशा (पान २ वर....)

केंद्रीय पथकाकडून महाराष्ट्रातील दुष्काळी परिस्थितीच्या पाहणीसाठी दौरा सुरू

८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय पथकाचा महाराष्ट्र दौरा

# दुष्काळ, पाऊस, पीक नुकसान, पिण्याचे पाणी, जनावरांच्या चाऱ्याबाबत राज्य शासनाकडून केंद्रीय पथकाकडे सविस्तर सादरीकरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे.

केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे या पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे.

राज्य शासनाकडून दुष्काळी स्थितीचे सविस्तर सादरीकरण

केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे आज मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले. राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी



राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती दिली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा सादर करण्यात आला. कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सुरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.

पिण्याच्या पाण्याच्या स्थितीचा आढावा

राज्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन तसेच भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी सादर केली. जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज यांच्यासह ऊर्जा विभागाच्या वतीने सद्यस्थितीचा आढावा सादर करुन आगामी सात महिन्यातील संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. यावेळी लघुपाटबंधारे तलाव (एमआय टँक), गावांमधील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्यस्थिती याबाबतही केंद्रीय पथकाला माहिती देण्यात आली.

प्रत्यक्ष पाहणीसाठी जिल्हे आणि ठिकाणे निश्चित

राज्य शासनाने सादर केलेली आकडेवारी, उपलब्ध पुरावे आणि विविध विभागांकडून मिळालेल्या माहितीची केंद्रीय पथकाने दखल घेतली. या माहितीच्या आधारे दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कोणत्या जिल्ह्यांना आणि ठिकाणांना भेटी द्यायच्या, याबाबत नियोजन करण्यात आले.

केंद्रीय पथकातील अधिकारी राज्यातील विविध भागांत जाऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. यासाठी विविध पथके तयार करुन जास्तीत जास्त क्षेत्राचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पाहणीदरम्यान स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा करणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह केंद्रीय पथकातील सदस्य आणि राज्यातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



# ऑक्टोबर हीट; तापमान वाढीने नागरीक हैराण; पंढरपुरात दुष्काळाच्या झळा आणखी तीव्र

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : यंदाच्या पावसाळी अंगामध्ये पावसाने पाठ फिरवल्याने पंढरपूर तालुक्यासह सोलापूर जिल्ह्यात दुष्काळाची तीव्रता वाढताना दिसत आहे. आता ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीला उन्हाची तीव्रता जाणवत असल्याने पंढरपूर शहरातील कमाल तापमान ३५ ते ३६ अंश सेल्सिअस पर्यंत पोचले आहे. पुढील महिन्यात आणि तापमान वाढण्याची शक्यता असल्याने नागरिकांची चिंता वाढली आहे.

दुपारच्या वेळी कुणाची तीव्रता एवढी वाढत आहे की शहरातील प्रमुख रस्त्यावर वर्दळ कमी होऊन रस्तेओस पडू लागले आहेत. दुपारच्या वेळेस बाहेर जाण्याचे टाळले जात असून



उन्हापासून बचाव करण्यासाठी थंड पाणी व सावलीचा आधार घेतला जात आहे.

यंदाच्या पावसाळी हंगामात सरासरी तूट राहिले असल्याने ग्रामीण भागात दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पाऊस पुरीसा न झाल्यामुळे खरीप हंगाम मोठ्या प्रमणात वाया गेला असून, शेतकऱ्यांचे अपेक्षित उत्पादन मिळालेली नाही. जमिनीमध्ये ठीक ठिकाणी भेगा पडल्या असून जमिनीचा पाण्याचा ओलावा कमी झाला आहे. कारे हंगामाची पेरणी करायची वेळ आली असतानाही पाऊस नसल्याने शेतकऱ्याची मोठी संकट उभा राहिले. शेतीमध्ये पुरासा बोलावा नसल्यामुळे रब्बी पेरणी लांबणार आहे.

दुष्काळाची झळ शेतीपूर्ती मर्यादित राहिले नसून त्याचा परिणाम पशु पक्ष व ही परिणाम झालेला आहे. ग्रामीण भागात दरवाजांसाठी पिण्याची पाण्याची सोय चाऱ्याची टंचाई जाणवू लागली आहे. ऑक्टोबर महिन्यात अशी परिस्थिती निर्माण झाल्यानंतर चाऱ्याची परिस्थिती व पाण्याची परिस्थिती पुढे गंभीर होणार अशी शेतकऱ्याकडून व्यक्त केली जात आहे.

प्रशासनाच्या उपायोजना दुष्काळग्रस्त आणि पाणी चारा, विजेची टंचाईची संकट गडद होत आहे.

दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याने आगामी काळात ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातही पाणी वीज टंचाई, यांचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. एकीकडे पाणीसाठा झपाट्याने कमी होत चालत असल्याने. उन्हाळ्याच्या सुरुवातीपासूनच परिस्थिती गंभीर होण्याची चिन्हे दिसू लागली आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने साथ दिली नसल्याने खरीप हंगावर मोठे परिणाम झाले असल्याने आता रब्बी हंगामेरही पाण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे.

दुष्काळ सदृश्य भागामध्ये प्रशासनाकडून उपाय योजना सुरू करण्यात आले आहेत पण पावसाची कमतरता, वाढती तपमान खरीप हागमाचे नुकसान रिपीच्या पेरणीवर आलेली संकट त्यामुळे ग्रामीण भागातील परिस्थिती प्रशासनाला अधिक लक्ष द्यावे लागणार आहे. यंदा पावसाने दिलेली हुलकावणी व ऑक्टोबर महिन्यांमधील हिट मुळे अधिक पाऊस नाही आणि पाण्याचे संकट, वाढत्या कुणाच्या झळ्या या दुहेरी कोणी मुळे सोलापूर जिल्हा व पंढरपूर तालुक्यातील नागरिकांनी शेतकऱ्यांसमोर निर्माण झाली आहे.

## संपादकीय....

### केंद्रीय पथकाची पाहणी

खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे. पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधण्यात आले. राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती देण्यात आली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा सादर करण्यात आला. राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. राज्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गावांची माहिती देयात आली.

## १० हजारांपर्यंतच्या दंडालाही ब्रेक; जीएसटी कौन्सिलचा मोठा निर्णय

(पान १ वरून..) प्रकरणात आधी थेट २५ हजार रुपयांपर्यंतचा दंड आकारला जात होता. जीएसटी कौन्सिलने हा दंड आता १० हजार रुपयांवर आणला आहे. बैठकीत कौन्सिलने हेदेखील स्पष्ट केले आहे की, जे करदाते वेळेवर रिटर्न फाइल करणार नाहीत, कर भरण्यास उशीर करतील किंवा चुका करतील, त्यांच्याकडून कराची वसुली केली जाईल. अशा व्यापाऱ्यांवर व्याज आणि प्रमाणात दंड आकारला जाईल. मात्र, केवळ कर उशिरा भरल्याच्या कारणावरून कोणतीही कठोर किंवा जाचक कारवाई केली जाणार नाही, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीत कर दरांमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

## बहुजन चळवळीच्या जनजागृतीसाठी भिवंडीत चर्चासत्र व कार्यशाळा उत्साहात



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भिवंडी प्रतिनिधी/मिलिंद जाधव : बामसेफ, डीएस फॉर आणि बहुजन समाज पार्टी, भिवंडी लोकसभा यांच्या संयुक्त विद्यमाने भिवंडी येथील टिळक वाचन मंदिर येथे बहुजन समाजाच्या राजकीय, सामाजिक व वैचारिक जागृतीसाठी चर्चासत्र व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय नागरिकांना दिलेला मतदानाचा मूलभूत अधिकार, लोकशाही व्यवस्था आणि बहुजन समाजाची राजकीय भूमिका या विषयांवर कार्यशाळेत मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाचा अधिकार हा लोकशाहीतील नागरिकांच्या सहभागाचा महत्त्वाचा आधार असून, त्याबाबत समाजामध्ये जनजागृती करण्याची गरज असल्याचे यावेळी सांगण्यात आले. कार्यक्रमात बसपाचे महाराष्ट्र प्रदेश महासचिव अशोक गायकवाड यांनी प्रमुख मार्गदर्शक केले. तसेच सेवानिवृत्त उपजिल्हाधिकारी ना. पा. जाधव, सेवानिवृत्त नायब तहसीलदार यशवंत गायकवाड आणि बसपाचे ठाणे जिल्हा कोषाध्यक्ष नसीम शेख यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी लोकशाहीचे संरक्षण, मतदानाच्या अधिकाराचे महत्त्व, बहुजन समाजाची राजकीय जाणीव आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार याबाबत मान्यवरांनी आपले विचार मांडले. बहुजन समाजाने वैचारिकदृष्ट्या जागृत होऊन सामाजिक व राजकीय परिवर्तनाच्या प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला अनंत पाटील, सुधाकर पाटील, विजय पाटील आणि संतोष लोकरे यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विलास पाटील, विनोद जाधव आणि महेंद्र गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश जाधव यांनी केले, तर आभार प्रदर्शन कैलास गायकवाड यांनी केले. बहुजन समाजाची वैचारिक जागृती, लोकशाहीचे संरक्षण आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा संदेश या चर्चासत्र व कार्यशाळेतून देण्यात आला.

## एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी सवलत कार्ड नोंदणीच्या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर/केतन भोज ; भारतीय जनता पार्टी – प्रभाग क्रमांक १२९च्या वतीने तसेच भाजपा नगरसेविका सौ. अश्विनी भरत मते यांच्या सहकार्याने एस.टी. महामंडळ आपल्या दारी या संकल्पने अंतर्गत एस.टी. महामंडळाच्या एनसीएमसी सवलत कार्ड नोंदणीसाठी विशेष शिबिराचे आयोजन मंगळवार, दि. ६ ऑक्टोबर २०२६ व बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत नगरसेविका सौ. अश्विनी भरत मते यांच्या कर्तव्य भवन कार्यालय, पारसीवाडी, घाटकोपर (पश्चिम) या ठिकाणी करण्यात आले होते.





या शिबिराला परिसरातील महिला, पुरुष नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला असून, तब्बल ४५० नागरिकांनी सवलत कार्डासाठी नोंदणी केली.

या शिबिरामध्ये १२ वर्षे पूर्ण झालेल्या सर्व महिलांसाठी महिला सवलत योजना, तसेच ६५ वर्षे पूर्ण झालेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी आणि ७५ वर्षांवरील अमृत नागरिकांसाठी पुरुष सवलत योजना याअंतर्गत नोंदणीची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती.

नोंदणीसाठी आधार कार्ड आणि आधार कार्डला लिंक असलेला मोबाईल क्रमांक आवश्यक होता. सवलत कार्डासाठी १९९ रुपये नोंदणी शुल्क आकारण्यात आले. नोंदणीनंतर सवलत कार्ड ३० दिवसांच्या आत मिळणार असल्याची माहिती देण्यात आली.

परिसरातील नागरिकांना सवलत कार्ड नोंदणीसाठी दूरवर जाण्याची आवश्यकता भासू नये, तसेच पात्र नागरिकांना त्यांच्या परिसरातच ही सुविधा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला मिळालेला प्रतिसाद उत्साहवर्धक ठरला. ४५० नागरिकांनी सवलत कार्डाचा लाभ घेतल्याने उपक्रमाचे यश अधोरेखित झाले.

## दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या, अन्यथा तीव्र आंदोलन करू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब/प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना जाहीर केलेली मदत तातडीने बँक खात्यात जमा करावी आणि ई-पीक पाहणी प्रक्रिया सुलभ करावी, या मागणीसाठी अखिल भारतीय छावा संघटनेच्या वतीने कळंब चे तहसीलदार मा. हेमंत ढोकले व तालुका कृषी अधिकाऱ्यांना या बाबतचे निवेदन देण्यात आले आहे. दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, चालू वर्षी अपुरा पाऊस झाल्याने कळंब तालुक्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांच्या हाता-तोंडाशी आलेली पिके वाया गेली असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने जाहीर केलेली दुष्काळी मदत अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा झालेली नाही. कोणतीही तांत्रिक अडचण न लावता ही मदत तातडीने जमा करावी.




तसेच तालुक्यातील अनेक गावांतील शेतकऱ्यांना ई-पीक पाहणी करताना सर्व्हर डाऊन, इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव आणि पमधील क्लिष्टतेमुळे अडचणी येत आहेत. त्यामुळे अनेक शेतकरी पीक नोंदणीपासून वंचित आहेत. महसूल व कृषी विभागाने गावोगावी विशेष शिबिरे घेऊन ही प्रक्रिया सुलभ व गतीने राबवावी, जेणेकरून शेतकरी शासकीय लाभांपासून वंचित राहणार नाहीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

### अखिल भारतीय छावा संघटनेचा इशारा

प्रशासनाने तातडीने सकारात्मक निर्णय न घेतल्यास शेतकऱ्यांच्या हक्कासाठी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनात देण्यात आला आहे. या निवेदनावर कळंब तालुकाध्यक्ष अमर गायकवाड, तालुका उपाध्यक्ष सचिन पठाडे, प्रशांत कांबळे, राजपाल हौसलमल यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात ग्रंथ पूजन आणि सप्ताहांचा शुभारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : अप्पर जिल्हाधिकारी गणेश नेहाळी, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, उपजिल्हाधिकारी महसूल अंजली मुरुड उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख तहसीलदार पूनम दंडेले तहसीलदार सरस्वती पाटील नायब तहसीलदार बालाजी बनसोडे तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाची सहाय्यक कुलसचिव




प्राध्यापक शिवाजी शिंदे जिल्हा मराठी भाषा समिती सदस्य पद्माकर कुलकर्णी आदी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते

यावेळी जिल्हाधिकारी एस कीर्तीकेयन यांनी अभिजीत मराठी भाषा दिनानिमित्त उपस्थित सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या व मराठी भाषा ही शिकण्यासाठी अतिशय सोपी व प्रेमळ भाषा असून संत व साहित्यिकांनी मराठी भाषा समृद्ध केली आहे, अशी त्यांनी सांगितलं.

प्राध्यापक शिवाजी शिंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की मराठी भाषा ही समृद्ध भाषा असून शासनाने २०२४ मध्ये मराठीला अभिजीत भाषेचा दर्जा देऊन तुझी उंची वाढवली आहे संत ज्ञानेश्वर महाराज व संत तुकाराम महाराज तसेच संतांनी मराठी भाषेतला गोडवा जगासमोर आणला, छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठी भाषेचा धारदार बाणा जगाला दाखवला. होय बघा अनुसार भाषेची बोली बदलते प्रत्येक भागात भाषेची लय वेगळी जाणवते. मराठी भाषा ही शब्दांनी समृद्ध अशी भाषा आहे शासनाच्या धोरणानुसार जिल्हा मराठी भाषा समितीने अतिशय जुन्या ग्रंथाचे डिजिटायझेशन करून ग्रंथ जतन केले आहेत.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मराठी भाषा समिती सदस्य पद्माकर कुलकर्णी यांनी केले.

अभिजीत भाषा दिन केवळ उत्साहापुरता नको, तर मराठी तळागाळापर्यंत पोहोचवण्याची गरज केवळ अभिजीत भाषा दिन साजरा करून उपयोग होत नाही, तर मराठी भाषा ही विद्यार्थ्यांपासून सर्वसामान्य नागरिकांपर्यंत तळागाळात पोहोचवण्यासाठी ठोस प्रयत्न होणे गरजेचे आहे सध्या महाराष्ट्रात मराठी भाषा विषयात बोर्डाच्या परीक्षेत तब्बल ९० हजार विद्यार्थी नापास झाल्याची समोर आली आहे. ही बाब गांभीर्याने घेऊन मराठी भाषेच्या शिक्षणासाठी आणि विद्यार्थ्यांमध्ये भाषेची गोडी निर्माण करण्यासाठी प्रभावी उपक्रम राबवण्याची गरज आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल – yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती; मुख्यमंत्री सहायता निधीस मंदिर समितीमार्फत दोन कोटी रुपयांची मदत

## कार्तिकी यात्रेनिमित्त १४ नोव्हेंबरपासून २४ तास दर्शन; आषाढी यात्रेप्रमाणे भाविकांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देणार : गहिनीनाथ महाराज औसेकर; मंदिर समितीची सभा संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : राज्यातील दुष्काळसदृश परिस्थिती विचारात घेता सामाजिक उत्तरदायित्व आणि मानवतावादी भूमिकेतून मुख्यमंत्री सहायता निधीस रु. ०२ कोटींची मदत शासनाची पूर्वपरवानगी घेऊन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच आगामी कार्तिकी यात्रेच्या अनुषंगाने नियोजनाचा आढावा घेण्यात आला असून, दि. १४ नोव्हेंबर पासून २४ तास दर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आषाढी यात्रेप्रमाणेच कार्तिकी यात्रेतही भाविकांना आवश्यक त्या सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीची सभा सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या अध्यक्षतेखाली दि. ८ ऑक्टोबर रोजी श्री विठ्ठल-रुक्मिणी भक्तनिवास येथे संपन्न झाली. महाराष्ट्र विधान परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने लागू असलेल्या आदर्श आचारसंहितेचे काटेकोरपणे पालन करून ही सभा पार पडली. सभेस सदस्य शकुंतला नडगिरे, डॉ. दिनेशकुमार कदम, संभाजी शिंदे, ह.भ.प. ज्ञानेश्वर देशमुख (जळगांवकर), ड. माधवी निगडे, सौ.डॉ. प्रणिती भगीरथ भालके नगराध्यक्षा, ह.भ.प. प्रकाश जवंजाळ, भागवत भूषण अतुलशास्त्री भगरे गुरुजी, ह.भ.प. शिवाजीराव मोरे, कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, आस्थापना विभाग प्रमुख राजेंद्र सुभेदार आदी उपस्थित होते.

राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री सहायता निधीस मदत देण्याबाबत सभेत चर्चा करण्यात आली. सामाजिक उत्तरदायित्व आणि मानवतावादी दृष्टिकोनातून शासनाची पूर्वपरवानगी घेऊन रु. दोन कोटींची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. आगामी कार्तिकी यात्रा दि. १० ते २४ नोव्हेंबर या कालावधीत होत असून, भाविकांच्या सोयीसाठी दि. १४ नोव्हेंबरपासून २४ तास दर्शन उपलब्ध करून देण्यात येणार आहे. आषाढी यात्रेच्या धर्तीवर कार्तिकी यात्रेतही दर्शन व्यवस्था, स्वच्छता, पिण्याचे पाणी, आरोग्य, सुरक्षा, निवास व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत नियोजनाचा आढावा घेण्यात आला. यात्रेतील प्रथा-परंपरा, शासकीय महापूजा, मंदिर समितीमार्फत होणारी पाद्यपूजा, नित्यपूजा तसेच भाविकांना देण्यात येणाऱ्या विविध सुविधांचाही आढावा घेण्यात आला.

याशिवाय, मंदिर समितीची सन २०२७ साठी दिनदर्शिका व दैनंदिनी छपाई, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या पंढरपूर येथील पर्यटक निवासाची जागा उपलब्ध करून घेण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करणे, तसेच प्रसार भारतीच्या 'थतएड' या सार्वजनिक सेवा आधारित ओटीटी व्यासपीठावर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरातील धुपारतीचे विनामूल्य थेट प्रक्षेपण करण्याच्या प्रस्तावास मंजुरी देण्यात आली.

मंदिर समितीच्या जमिनी व मालमत्तेचे प्रभावी व्यवस्थापन करण्यासाठी शासन सेवेतून सेवानिवृत्त व अनुभवी नायब तहसीलदार यांची मानधन तत्त्वावर तात्पुरत्या स्वरूपात मालमत्ता अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे व मंदिर समितीचे कर्मचारी तुकाराम कुलकर्णी यांचे नुकतेच हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. त्यांच्या निधनाबद्दल सभेत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करून शोकप्रस्ताव पारित करण्यात आला. तसेच मंदिर समितीचे विभाग प्रमुख भीमाशंकर सारवडकर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा मंदिर समितीच्या वतीने सन्मान करण्यात आला याबाबत माहिती मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्रीकांत यादव यांनी दिली.



## घोळसगाव येथे शनी अमावस्या निमित्त देशभक्ती कार्यक्रमसह विविध धार्मिक, कर्यक्रम



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट तालुक्यातील घोळसगाव आणि उमरगा तालुक्यातील बोळेगाव सरहद्दीवर वसलेले स्वयं जागृत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान येथे शनी अमावस्या यात्रा महोत्सव निमित्त शनिवार १० ऑक्टोबर रोजी दिवसभर देश भक्ती कार्यक्रमसह विवध धार्मिक, कर्यक्रमांचे आयोजन केले असल्याची माहिती देवस्थान समितीचे अध्यक्ष आप्पासाहेब कीवडे यांनी दिली .

पश्चिम महाराष्ट्रातील घोळसगाव आणि मराठवाड्यातील बोळेगाव सरहद्दीवर वसलेले शनेश्वर देवस्थान येथे जय भारत माता सेवा समितीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचे दिव्य सानिध्यात प्रत्येक शनी अमावस्या यात्रेस तुळजापूर, उमरगा, अफजलपूर, आंळद व अक्कलकोट तालुक्यातील भाविक भक्त या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी करतात. यामुळे यंदा यात्रा कमिटीचे वतीने शनी अमावास्या यात्रेची जयत्त तयारी करण्यात आले आहेत.

शनिवार दि.१० रोजी पहाटे श्री चे महापूजा, म्हारुद्राभिषेक, नवग्रह पूजा, होमहवन इत्यादी कार्यक्रम होणार असून सकाळी सात वाजता घोळसगाव ग्राम प्रदिक्षण करीत श्रीचे भव्य पालखी मिरवणूक विविध वाद्य समवेत श्री शनेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यत निघणार आहे. यानंतर राष्टीय संत सदगुरु श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांचा दर्शन सोहळा, महाप्रसाद इत्यादी कार्यक्रम होणार असून भाविक भक्तांनी दर्शन आणि महाप्रसादचा आवश्य लाभ घ्यावी असे आवाहन सचिव राजेंद्र काळे यांनी केले आहे.

## सेवा संकल्प अभियानांतर्गत ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून वनमजुराचा सन्मान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळं/प्रतिनिधी : वाशी तालुक्यातील मौजे डोंगरेवाडी (सेलू) येथील ग्राम महसूल अधिकारी डी.व्ही. सिरसेवाड पाटील हे नेहमीच शेतकऱ्यांप्रती तत्पर असतात.

मागील काळात 'हरित धाराशिव' अभियानांतर्गत महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाच्या जमिनीवर मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्यात आली होती. मौजे डोंगरेवाडी येथील सर्व्हे नं. ७६, २४ लगतच्या शेतातील पीक पंचनामा करत असताना, ग्राम महसूल अधिकाऱ्यांना जवळच लागवड केलेली झाडे दिसली.



प्रत्यक्ष पाहणी केली असता, तेथील वनमजूर दिलीप भगवान चौरे हे लागवडीपासूनच त्या झाडांची अत्यंत व्यवस्थित जोपासना करत असल्याचे दिसून आले. त्यांचे हे कार्य केवळ शासकीय कर्तव्य म्हणून नव्हे, तर पर्यावरण प्रेमातून असल्याचे निदर्शनास आले.

'विकसित भारत' घडवण्यासाठी पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, जलसंधारण आणि वृक्षारोपणासोबतच त्यांची निगा राखणे अत्यंत महत्त्वाचे असून, या कार्यात वनमजुराचे योगदान मोलाचे असल्याचे सांगत ग्राम महसूल अधिकारी सिरसेवाड पाटील यांनी पुष्पगुच्छ देऊन वनमजूर दिलीप चौरे यांचा सन्मान केला.

या उपक्रमाबद्दल शेतकरी बांधवांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

## टेंभू-म्हैसाळ योजनेच्या पाणी प्रश्नावर आमदार बाबासाहेब देशमुख यांची मुख्य अभियंता अलका अहिरराव यांच्यासोबत बैठक; लवकरात लवकर पाणी सोडण्याचे आश्वासन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला / कोल्हापूर : सांगोला तालुक्यातील टेंभू आणि म्हैसाळ सिंचन योजनांच्या विविध मागण्या व पाण्याच्या प्रश्नांबाबत आमदार बाबासाहेब देशमुख यांनी आज सिंचन भवन, कोल्हापूर येथे मुख्य अभियंता अलका अहिरराव मॅडम आणि इतर संबंधित अधिकाऱ्यांसोबत महत्त्वपूर्ण बैठक घेतली. या बैठकीत पाण्याचे सर्व प्रश्न सोडविण्याबाबत सविस्तर चर्चा झाली.



यावेळी सोनंद पंचायत समिती गणाचे सदस्य मुकेश काशीद तसेच सोनंद-गळवेवाडी भागातील अनेक शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांनी टेंभू व म्हैसाळ योजनांमधून पाणी उपलब्ध न होण्याच्या समस्या, सिंचनातील अडचणी आणि संबंधित मागण्या मांडल्या. आमदार बाबासाहेब देशमुख यांनी शेतकऱ्यांच्या या अडचणींना आवाज देत अधिकाऱ्यांकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली.

बैठकीत मुख्य अभियंता अलका अहिरराव मॅडम यांनी शेतकऱ्यांच्या समस्यांची दखल घेतली आणि लवकरात लवकर पाणी सोडण्याचे आश्वासन दिले. त्यांनी संबंधित यंत्रणेला आवश्यक सूचना देऊन पाणी उपलब्धतेबाबत सकारात्मक भूमिका घेतली.

आमदार बाबासाहेब देशमुख यांनी या बैठकीनंतर सांगितले की, सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. टेंभू आणि म्हैसाळ योजनांमधील अडचणी दूर करून शेतकऱ्यांना वेळेवर पाणी उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलली पाहिजेत. उपस्थित शेतकऱ्यांनीही या बैठकीबद्दल समाधान व्यक्त केले आणि लवकरच पाणी उपलब्ध होईल अशी आशा व्यक्त केली.

या बैठकीमुळे सांगोला तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दीर्घकाळच्या मागण्यांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष दिले असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. आता मुख्य अभियंत्यांनी दिलेल्या आश्वासनाची अंमलबजावणी लवकर होईल, अशी अपेक्षा शेतकरी वर्गाकडून व्यक्त केली जात आहे.

## कळंब येथे अब्दुल माजिद काझी यांचा शिक्षक भूषण पुरस्काराने गौरव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब /प्रतिनिधी : जिल्हा परिषद कन्या प्रशाला,कळंब येथील उपक्रमशील सहशिक्षक अब्दुल माजिद काझी यांचा आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त पुरस्कार सेवा समिती, कळंबच्या वतीने 'शिक्षक भूषण' पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक बी.डी. कदम हे होते. याप्रसंगी पुरस्कार सेवा समितीचे अध्यक्ष महादेव महाराज अडसूळ यांनी काझी सरांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याचे सांगून त्यांचे अभिनंदन केले.

या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनानिमित्त शाळेतील सर्व शिक्षकांचा गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी ज्येष्ठ सदस्य तथा धाराशिव जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष सुरेश टेकाळे, माधवसिंग राजपूत, कल्याण खापे यांनी सर्व शिक्षकांना आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आभार सहशिक्षक पवार यांनी मानले. यावेळी शाळेतील शिक्षक डी.ओ. पवार, अनिल शेळके, गणेश आंबाड, सुनील मस्के, शुभांगी नखाते, सूर्यकांत वाघमारे, सविता घंटे, हनुमंत झोंबाडे, अर्चना घुटे, संध्या लाटे, साक्षी कवडे आदींची उपस्थिती होती.

### प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीमध्ये 'एसएईइंडिया कॉलेजिएट क्लब' चा स्थापना सोहळा संपन्न

# विद्यार्थ्यांची कार्यशाळा आणि उपक्रमांच्या माध्यमातून जागतिक स्तरावर ओळख होते : स्पेक्ट्रा टेकचे संस्थापक संचालक केशव ताम्हणकर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : 'आजच्या स्पर्धात्मक युगात उद्योगाच्या गरजांनुसार सक्षम, संशोधनाभिमुख आणि भविष्यवेधी अभियंते घडविण्याची आवश्यकता आहे. शैक्षणिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष तांत्रिक अनुभव मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी एसएईइंडिया अंतर्गत आयोजित विविध तांत्रिक प्रकल्प, राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा, कार्यशाळा आणि उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घ्यावा. नवोपक्रम, शाश्वत तंत्रज्ञान आणि सतत शिकण्याची वृत्ती या गुणांच्या माध्यमातून विद्यार्थी जागतिक स्तरावर स्वतःची ओळख निर्माण करू शकतात.' असा विश्वास एसएईइंडिया वेस्टर्न सेक्शनचे सचिव तथा स्पेक्ट्रा टेकचे संस्थापक संचालक केशव विनायक ताम्हणकर यांनी व्यक्त केला.



गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) येथे स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एसएईइंडिया कॉलेजिएट क्लबचा स्थापना सोहळा अलीकडेच उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. यावेळी मार्गदर्शन करताना स्पेक्ट्रा टेकचे संस्थापक संचालक ताम्हणकर हे मार्गदर्शन करत होते. या कार्यक्रमासाठी ऑटोमोबाईल उद्योगातील उत्पादन, विकास, मोबिलिटी सोल्युशन्स व नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव असलेले ज्येष्ठ तज्ज्ञ मिलिंद रामदासी, एसएईइंडिया वेस्टर्न सेक्शनचे गव्हर्निंग बोर्ड सदस्य महेश मसुरकर, व्यवस्थापक सागर मुरुगकर आदी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. ऑटोमोबाईल अभियांत्रिकी क्षेत्रातील तांत्रिक नवोपक्रम, नेतृत्व विकास आणि उद्योगाभिमुख कौशल्ये विकसित करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमास विद्यार्थी व प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विशेष अतिथी मिलिंद ए. रामदासी यांनी आपल्या भाषणातून उद्योगातील अनुभवातून ऑटोमोबाईल क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान, उत्पादन विकास, संशोधन आणि कौशल्य विकासाच्या संधींबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. उद्योग क्षेत्रातील अपेक्षा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांनी सर्जनशीलता, व्यावहारिक ज्ञान आणि संघभावना जोपासण्याचे महत्त्व त्यांनी विशद केले. या कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी एसएईइंडिया कॉलेजिएट क्लबच्या नव्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळाही संपन्न झाला. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पदाधिकाऱ्यांना नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली तसेच वर्षभर विविध तांत्रिक, संशोधनात्मक, उद्योगाभिमुख उपक्रम, तज्ज्ञ व्याख्याने, कार्यशाळा, औद्योगिक भेटी आणि राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांचे आयोजन करण्याचा संकल्प करण्यात आला. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी 'एसएईइंडिया कॉलेजिएट क्लब' च्या विद्यार्थी पदाधिकाऱ्यांची घोषणा करण्यात आली. त्यामध्ये पदाधिकारी म्हणून विद्यार्थी अध्यक्ष वेदांत विश्वासराव देशमुख, उपाध्यक्ष संस्कार रविकांत मोरे, सचिव गौरी शिवलिंग महाजन, कोषाध्यक्ष श्रद्धा शिवलिंगप्पा कारभारी, रिसेप्शन चेअर यज्ञा नागेश जाधव, प्रोग्राम चेअर ओम दिलीप गाडे, पब्लिसिटी चेअर आदित्य मल्लिकार्जुन माळी, मेंबरशिप चेअर अथर्व सदानंद गवळी, इंडस्ट्री कनेक्ट चेअर अक्षता महेंद्र शिंदे आणि प्रोजेक्ट चेअर साक्षी संतोष कारंडे यांची निवड करण्यात आली. पाहुण्यांचे हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले. स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, गुणवत्तापूर्ण शिक्षणाविषयीची दृढ बांधिलकी आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे तसेच महाविद्यालयातील उच्च शिक्षित प्राध्यापकांच्या सहकार्याने अशा उद्योगाभिमुख उपक्रमांना सातत्याने चालना मिळत आहे. विभागातील सर्वांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे तसेच एसएईइंडिया कॉलेजिएट क्लबचे स्वेरीतील सल्लागार डॉ. दिग्विजय रोंगे, समन्वयक डॉ. नितीन कौटकर, सह-समन्वयक प्रा. स्वप्ना वसेकर, वर्कशॉप इन्चार्ज डॉ. एस.बी. भोसले, समन्वयक प्रा. डी.टी. काशीद, आयक्युएसी व विभागप्रमुख डॉ.एस. एस. वांगीकर, अधिष्ठाता डॉ.आर. आर. गिड्डे, तसेच 'एसएईइंडिया कॉलेजिएट क्लब' च्या विद्यार्थी प्रतिनिधींनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विशेष परिश्रम घेतले. या यशस्वी कार्यक्रमाबद्दल स्वेरीचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) चे प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सूरज रोंगे, कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम. एम. पवार, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी 'एसएईइंडिया कॉलेजिएट क्लब' च्या नव्या कार्यकारिणीचे अभिनंदन करून त्यांच्या भावी कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# वोट चोरी आणि राहुल गांधींच्या अटकेच्या निषेधार्थ बुलडाण्यात काँग्रेसचा एल्गार; 'लोकशाही बचाव'साठी रस्त्यावर!

## ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा आणि 'रंगा-बिल्लां'नी देशाची माफी मागावी : प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : 'वोट चोरी'च्या विरोधात आवाज उठवणारे काँग्रेसचे नेते राहुल गांधी आणि 'इंडिया' (खछऊख) आघाडीच्या खासदारांना ज्या पद्धतीने अटक करण्यात आली, त्याचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी बुलडाण्यात काँग्रेसच्या वतीने आक्रमक 'लोकशाही बचाव आंदोलन' करण्यात आले. यावेळी केंद्र आणि राज्य सरकारच्या दडपशाहीविरोधात जोरदार घोषणाबाजी करत काँग्रेसने आपला एल्गार पुकारला.

'हा लोकशाहीला काळिमा फासणारा प्रकार'

आंदोलनादरम्यान बोलताना




काँग्रेस नेत्यांनी केंद्र सरकारवर सडकून टीका केली. राहुल गांधी आणि इंडिया आघाडीच्या खासदारांना रस्त्यात अडवून अटक करणे, हा



लोकशाहीच्या इतिहासातील काळा दिवस आहे. हा प्रकार लोकशाहीला काळिमा फासणारा असून राहुल गांधींचा आवाज दाबून वोट चोरीचा मुद्दा संपणार नाही, असा इशारा देण्यात आला. तसेच ज्ञानेश कुमार यांनी तात्काळ राजीनामा द्यावा आणि 'रंगा-बिल्लां'नी देशाची माफी मागावी, अशी स्पष्ट व आक्रमक मागणी यावेळी करण्यात आली.

'गेट वेल सून, देवेंद्रजी!'

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही काँग्रेसने यावेळी जोरदार निशाणा साधला. देशातील संविधानिक संस्था काँग्रेसने उभारल्या असून त्यांची स्वायत्तता आणि विश्वासार्हता उद्ध्वस्त करण्याचा अधिकार कोणालाही नाही. देवेंद्र फडणवीसांनी आधी या संस्थांचा इतिहास समजून घ्यावा. जनतेच्या प्रश्नांवर केवळ चिडचिड करण्यापेक्षा त्यांनी उत्तरे द्यावीत, असे सांगत गेट वेल सून, देवेंद्रजी! असा खोचक टोला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी लगावला आहे.

पोलिसी कारवाईचा निषेध जनआंदोलनाचा इशारा

या आंदोलनादरम्यान बुलडाणा पोलिसांनी काँग्रेस कार्यकर्त्यांची धरपकड केली. पोलिसांनी केलेल्या या अमानुष अटकेचा काँग्रेसच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. वोट चोरीविरोधातील हे आंदोलन केवळ इथेच थांबणार नसून ते आता अधिक तीव्र केले जाईल. गावागावात आणि घराघरात हा आवाज पोहोचवून लोकशाहीच्या रक्षणासाठी मोठे जनआंदोलन उभे केले जाईल. लोकशाही वाचवण्यासाठीचा हा संघर्ष कोणत्याही दडपणाखाली थांबणार नाही, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ

मान्यवरांची उपस्थिती

या 'लोकशाही बचाव' आंदोलनात बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष प्रकाश पाटील, आमदार धीरज लिंगाडे, माजी आमदार राहुल बोंद्रे, माजी आमदार राजेश एकडे यांच्यासह स्वातीताई वाकेकर, लक्ष्मणराव घुमरे, ज्ञानेश्वर पाटील, रामविजय बुरुंगले, कासीम गवळी, दत्ता काकस, रिजवान सौदागर, तेजेंद्रसिंग शिवदास रिंढे,चव्हाण, अप्पा कदम या प्रमुख नेत्यांसह काँग्रेसचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन बार्शी तालुकाध्यक्षपदी अजितकुमार कराड



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बार्शी : महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियन जिल्हा शाखा सोलापूर अंतर्गत आज दिनांक ०७-१०-२०२६ रोजी बार्शी तालुका कार्यकारणी सदस्य मंडळाची स्थापना करण्यात आली. खालील प्रमाणे बार्शी तालुका कार्यकारणी मान्यता देण्यात आली.

तालुकाध्यक्ष अजितकुमार कराड

उपाध्यक्ष रमाकांत उकिरडे

कार्याध्यक्ष निलेश खळदकर

सचिव प्रवीण डोळे

कोषाध्यक्ष डॉ.सतीश काळे

तालुका संघटक सतीश देशमाने

महिला संघटक रूपाली झांबरे व इतर सर्व संवर्गातील प्रत्येक एक प्रतिनिधी यांची निवड निश्चित करण्यात आली या कार्यक्रमांमध्ये जिल्हाध्यक्ष श्री दयानंद परिचारक विभागीय संघटक डॉ.एस पी माने श्रीशैल्य देशमुख मुन्नाभाई कलशेट्टी यांनी मार्गदर्शन केले. तसेच डॉ. मनोज काशीद शैलेश सदाफुले निलेश खळदकर संजय उपरे व विष्णू पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कुंडलिक खुर्द यांनी केले.. यावेळी व्हिडिओ कॉल द्वारे राज्य अध्यक्ष पूजारवाड साहेब यांनीही सर्व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.

# भिवंडीत १४ ऑक्टोबरला 'महात्मा फुले महसूल लोकअदालत'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : महात्मा ज्योतिराव फुले यांच्या द्विशताब्दी जयंती वर्षाचे औचित्य साधून महसूल विभागाच्या माध्यमातून 'महात्मा ज्योतिराव फुले महसूल लोकअदालत अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत भिवंडी तहसीलदार कार्यालयातील प्रलंबित महसूलविषयक तक्रारी व अर्धन्यायिक प्रकरणे आपापसातील सहमती व तडजोडीने निकाली काढण्यात येणार आहेत.या अभियानात कुळ कायदा कलम ७०, ३२-ग , हक्कनोंद प्रकरणे, मामलतदार कोर्ट क्ट तसेच इतर अर्धन्यायिक प्रकरणांचा समावेश करण्यात आला आहे.

या प्रकरणांमध्ये संबंधित पक्षकारांची आपापसांत सहमती अथवा तडजोड झाली आहे, अशा प्रकरणांच्या जलद निपटाऱ्यासाठी संबंधितांनी आवश्यक कागदपत्रांसह 'प्रपत्र अ'मध्ये अर्ज तहसीलदार कार्यालयात सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

यासाठी अर्ज स्वीकारण्याची मुदत ६ ते १४ ऑक्टोबर २०२६ अशी असून, भिवंडी तहसीलदार कार्यालयातच या लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. पहिली महसूल लोकअदालत १४ ऑक्टोबर २०२६ रोजी होणार आहे.प्रलंबित महसूलविषयक अर्धन्यायिक प्रकरणांबाबत पक्षकारांनी आवश्यक कागदपत्रांसह तहसीलदार कार्यालयाशी संपर्क साधून या अभियानाचा लाभ घ्यावा असे आवाहन तहसीलदार अभिजीत खाले यांनी नागरिकांना केले आहे.

# कळंब तालुक्यातील शेळका धानोरा येथे वारकरी संप्रदायाची २५ वर्षांची अखंड परंपरा कायम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळेखामसवाडी/ प्रतिनिधी : कळंब तालुक्यातील शेळका धानोरा हे छोटे गाव आज वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय परंपरेमुळे जिल्ह्यात ओळखले जात आहे. गेल्या २२ ते २५ वर्षांपासून येथे अखंड भजन, कीर्तन, हरिपाठ आणि देव-देवतांची नित्य उपासना अविरतपणे सुरू आहे.

शेळका धानोरा गावातील महिला मंडळ गावासह तालुक्यातील सुद्धा भजणी कार्यक्रमाला निमंत्रण दिल्यास मोठया भक्तीभावाने मोफत सेवा देण्यासाठी वारकरी संप्रदायाने ही परंपरा आजही तेवढ्याच निष्ठेने जपली आहे. कोणतेही शासकीय अनुदान नसताना, केवळ लोकवर्गणी आणि श्रद्धेच्या विश्वासार्हतेवर हा अखंड नामजप सोहळा चालतो. याभक्ती सेवेत रेखा चंद्रकांत शेळके, इंदुबाई प्रकाश शेळके, अनिता चतुर्भुज शेळके,

> **गावात भक्तिमय वातावरण**
>
> **शेळका धानोरा येथे सायंकाळ झाली की मृदंगाच्या तालावर विठू नामाचा गजर सुरू होतो. लहान मुलांपासून ते वृद्धांपर्यंत सर्वजण या भजनात सहभागी होतात. या अखंड उपासनेमुळे गावात एकोपा, शांतता आणि संस्कार टिकून राहिले आहेत, अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.**



बाळासाहेब गोरोबा शेळके, सुरेखा बाळासाहेब शेळके, सिंधूबाई गणेश शेळके, निर्मला शिवाजी शेळके यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यासोबतच समस्त गावकरी मंडळी आणि वारकरी संप्रदायाचे वारकरी दररोज सायंकाळी एकत्र येऊन भजन-कीर्तन करतात.

> गेल्या पंचवीस वर्षांपासून एकही खंड न पडता सुरू असलेली ही परंपरा नवीन पिढीसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

**कांबा येथे हजारो महिलांचा एल्गार; सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत महिला मेळावा उत्साहात**

# महिला सक्षमीकरण, संविधान, आरक्षण आणि महागाईच्या मुद्द्यांवर सत्ताधाऱ्यांवर जोरदार निशाणा; नारीशक्ती हीच परिवर्तनाची ताकद : खासदार सुप्रिया सुळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कांबा, कल्याण प्रतिनिधी/ विजय घनघाव : कांबा, कल्याण येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य महिला मेळाव्याला हजारो महिलांनी उत्स्फूर्त उपस्थिती लावत नारीशक्तीचा दमदार हुंकार दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या या मेळाव्यात महिला सक्षमीकरण, महिला सुरक्षा, महागाई, बेरोजगारी, महिला आरक्षण, संविधानाचे संरक्षण आणि निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकता या मुद्द्यांवर सत्ताधाऱ्यांवर जोरदार टीका करण्यात आली.

सुप्रिया सुळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून उपस्थित महिलांशी थेट संवाद साधत त्यांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्नांना हात घातला. आज हजारो महिला या मेळाव्यात आल्या आहेत. तुमच्या हातातील मोबाईल केवळ माहेरी-सासरी बोलण्यासाठी नाही, तर आपल्या हक्कांचा आवाज बुलंद करण्यासाठीही वापरला पाहिजे, असे सांगत त्यांनी महिलांना सामाजिक आणि राजकीय सहभाग वाढविण्याचे आवाहन केले.

महागाई, बेरोजगारीवर सुळे यांचा घणाघात

मच्छी, तेल, दूध यांसह जीवनावश्यक वस्तूंच्या वाढत्या किमतींचा उल्लेख करत सुप्रिया सुळे यांनी





महागाईवर सरकारला धारेवर धरले. काळा पैसा बंद करण्याच्या घोषणा, नोटबंदी आणि त्यानंतर सामान्य नागरिकांना आलेल्या अडचणींचाही त्यांनी उल्लेख केला.

आगामी काळात आमचे सरकार आले तर तुमचे पैसे बँकेत जमा करण्यासाठी किंवा काढण्यासाठी कोणताही कर लावला जाणार नाही. नागरिकांच्या हाताला काम देणे आणि बेरोजगारी कमी करणे हे आमचे प्राधान्य असेल, असे त्या म्हणाल्या.

'लाडकी बहीण' योजनेवरही त्यांनी टीका केली. आज अनेक लाडक्या बहिणींचे पैसे कापले जात आहेत. मतांची गरज संपली की पैसे देण्याचे धोरण बदलते. आम्ही अशा फसव्या योजना देणार नाही, असा आरोप त्यांनी केला.

देश संविधानावर चालतो, कुणा एकाच्या मर्जीने नाही

निवडणूक प्रक्रिया आणि संविधानाच्या मुद्द्यावर बोलताना सुप्रिया सुळे यांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला.

आमचं घर फोडलं, पक्ष फोडला; पण हा देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानावर चालतो, कुणा एकाच्या मर्जीने नाही, असे त्या म्हणाल्या. निवडणुका पारदर्शक पद्धतीने झाल्या पाहिजेत, अशी मागणी करत त्यांनी मतदारांच्या अधिकारांचे संरक्षण करण्याची भूमिका मांडली.

महिला आरक्षणाचा मुद्दाही त्यांनी उपस्थित केला. महिला आरक्षणाचा निर्णय झाल्यानंतर त्याची लोकसभा आणि विधानसभांमध्ये प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक असल्याचे सांगत २०२९ पर्यंत महिला आरक्षणाची अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

आज अनेक महिलांनी संघर्ष केला, त्याग केला आहे. उद्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी महिलांना त्यांचा मान, सन्मान आणि स्वाभिमान परत मिळवून दिल्याशिवाय आम्ही स्वस्थ बसणार नाही, असा निर्धार सुप्रिया सुळे यांनी व्यक्त केला.

जितेंद्र आव्हाड यांचा दुष्काळ, संविधान आणि महिला अधिकारांवर प्रहार

पक्षाचे मुख्य प्रवक्ते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी दुष्काळ, संविधान बचाव, महिला अधिकार आणि आरक्षणाच्या प्रश्नांवर सरकारला लक्ष्य केले. महिलांच्या प्रश्नांसाठी संघटितपणे लढा उभारण्याचे आवाहन त्यांनी केले.

जितेंद्र आव्हाड यांचा सरकारवर निशाणा

पक्षाचे मुख्य प्रवक्ते आमदार जितेंद्र आव्हाड यांनी आपल्या भाषणातून दुष्काळ, संविधान बचाव, महिला अधिकार आणि आरक्षणाच्या प्रश्नांवर सरकारला धारेवर धरले. महिला शक्तीला संघटित करून सामाजिक आणि राजकीय लढ्याला बळ देण्याचे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक आणि कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक भरत गोंधळे यांच्याकडे पाहत आव्हाड यांनी गंभीर शैलीत, भरत भाऊ,सारखा प्रामाणिक कार्यकर्ता पक्ष सोडून जातो तेव्हाकाळजाला जखमा होतात. मी स्वतः भरत ला सांगितलं होते की जाऊ नको. पण वेळ होती, वेळ गेली आता आमचा भरत परत माघारी आला आहे आणि त्यांच्या येण्याने पक्षाला ठाणे जिल्हा ग्रामीण ला एक नव संजीवनी जरूर भेटेल असा आत्मविश्वास आ. जितेंद्र आव्हाड यांनी व्यक्त केला.

ठाणे पुन्हा राष्ट्रवादीचा बालेकिल्ला बनला पाहिजे

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे यांनी ठाणे जिल्हा पुन्हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला बनविण्याचे आवाहन केले.

नारीशक्तीमध्ये राज्यातील आणि देशातील राजकारण बदलण्याची ताकद आहे. 'लाडकी बहीण' योजनेमुळे महायुतीच्या सत्तेची समीकरणे जुळली; मात्र आता परिस्थिती बदलली आहे, असे ते म्हणाले.

राज्यातील कोरडा दुष्काळ, पाणीपुरवठ्याचा तुटवडा आणि दिल्लीतील आंदोलनाच्या मुद्द्यांवरही त्यांनी भाष्य केले. नारीशक्तीने आपली ताकद दाखवावी. या लढ्याची सुरुवात भरत गोंधळे यांनी केली आहे. अब अपनी बारी आयेगी! असा जोशपूर्ण संदेश शशिकांत शिंदे यांनी दिला.

पदासाठी नाही, संघटना मजबूत करण्यासाठी काम - भरत गोंधळे

कार्यक्रमाचे मुख्य आयोजक भरत गोंधळे यांनी प्रास्ताविकातून खासदार सुप्रिया सुळे यांचे आभार मानले. पदासाठी काम करणारा मी कार्यकर्ता नाही. सरकारे येतात आणि जातात; मात्र आपले संघटन मजबूत आणि एकजूट राहिले पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

महिला मेळाव्यात सहभागी झालेल्या महिलांना आयोजक भरत गोंधळे यांच्या वतीने साड्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला महिलांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

मान्यवरांची उपस्थिती

या महिला मेळाव्याला प्रमुख पाहुणे म्हणून महेश तपासे - प्रभारी, कल्याण लोकसभा, ज्येष्ठ नेत्या विद्या वेखंडे, डॉ. रुपाली कराळे - महिला जिल्हाध्यक्ष, ठाणे जिल्हा ग्रामीण, सोमनाथ मिरकुटे - कल्याण तालुका अध्यक्ष, विनायक पवार, कमलाकर टावरे, वंडार पाटील - कल्याण-डोंबिवली शहर जिल्हाध्यक्ष, नंदू मोगरे - शहापूर अध्यक्ष आदी मान्यवर उपस्थित होते.

तर कार्यक्रमाचे निमंत्रक म्हणून रविंद्र परटोळे, निलेश कडु, अनंता ठाकरे, सागर राठोड, ज्योती वाघमारे, आम्रपाली लोखंडे आणि संतोष म्हस्कर यांनी विशेष भूमिका बजावली.

महिला मेळाव्याला मोठी गर्दी असल्याने कल्याण तालुका पोलीस प्रशासनाच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. त्यामुळे कार्यक्रम शांततेत आणि सुरळीत पार पडला.

कांब्यातून नारीशक्तीचा राजकीय संदेश

महिला सक्षमीकरणासोबतच महागाई, बेरोजगारी, महिला सुरक्षा, आरक्षण, संविधान आणि निवडणूक पारदर्शकता यांसारख्या ज्वलंत विषयांवर झालेल्या जोरदार भाषणांमुळे कांबा येथील महिला मेळाव्याला राजकीय महत्त्व प्राप्त झाले. हजारो महिलांची उपस्थिती, उत्स्फूर्त प्रतिसाद आणि नेत्यांच्या आक्रमक भाषणांमुळे नारीशक्तीच्या माध्यमातून राजकीय परिवर्तनाची नवी सुरुवात असा संदेश या मेळाव्यातून देण्यात आला.